सुराज्य
२१ वा वर्धापन दिन विशेष

अस्सल सोलापुरी

# सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. २३ ऑगस्ट २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३२४ वा किंमत : ५ रुपये | पाने ८+४


## भारत लवकरच ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनेल : मोदी

**नवी दिल्ली :** भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था आहे. लवकरच भारत ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनेल. १०० पेक्षा जास्त युनिकॉर्नसह भारतामध्ये जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप इकोसिस्टम आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटलं. दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे ब्रिक्स बिझनेस फोरम लीडर्स काऊन्सिलमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलत होते.नरेंद्र मोदी म्हणाले की, ब्रिक्स बिझनेस काऊन्सिलने दहा वर्षांत आमचे आर्थिक सहकार्य वाढवण्यात खूप महत्त्वाची भूमिका बजावली आहे. जेव्हा २००९ मध्ये ब्रिक्सची पहिली परिषद झाली, तेव्हा जग मोठ्या आर्थिक संकटातून बाहेर येत होते. या काळात ब्रिक्स हा जागतिक अर्थव्यवस्थेसाठी आशेचा नवा किरण म्हणून उदयास आला होता.



# कांदा करतोय महायुतीत 'वांदा' भाजप-राष्ट्रवादीत 'पाय' ओढाओढी


## मुंडेंनी ताडकन 'दिल्ली' गाठली, फडणवीसांनी जपानमधूच 'चावी' फिरवली

**सुराज्य/विशेष प्रतिनिधी**

**केंद्र सरकारने कांद्यावर ४० टक्के निर्यातशुल्क लागू केल्यानंतर महाराष्ट्रात राजकीय पटलावर एका नव्या वादाला तोंड फुटले आहे. या कराचा सर्वाधिक फटका महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसत आहे,अशी ओरड शेतकरी संघटनांसह विरोधी पक्षांकडून सुरू झाली आहे त्यामुळे शेतकऱ्यांमधून संतप्त भावना उमटू लागल्या आहेत. केंद्राच्या या निर्णयाविरोधात राज्यातले शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. शेतकऱ्यांच्या हितासाठी नाशिक आणि अहमदनगर येथे विशेष खरेदी केंद्र सुरू करण्यात येतील. २,४१० रुपये प्रतिक्विंटल या दराने ही खरेदी करण्यात येईल,असे महायुतीच्या सरकारकडून सांगण्यात आले. कांद्याच्या प्रश्नावर तोडगा काढण्याची मागणी घेवून राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे हे मंगळवारी ताडकन दिल्लीला गेले. ही खबर कानावर पडताच जपानमधूनच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'चक्र' फिरवले. मुंडेंचे परस्पर राजधानीला जाणे म्हणजे भाजपला शह दिला.पण फडणवीसांनी राष्ट्रवादीच्या या प्रयत्नांना चतुराई दाखवत वेळीच रोखले. श्रेय घेण्यावरून भाजप व राष्ट्रवादी यांच्यात अशी पायओढाओढी झाली.शेतकरी,ग्राहकांना रडवणारा हा कांदा आता महायुतीच 'वांदा' करतो आहे.**

केंद्र सरकारने ३१ डिसेंबरपर्यंत कांद्यावर ४० टक्के निर्यातशुल्क लागू केले आहे. याप्रश्नी तोडगा काढण्यासाठी राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी हे मंगळवारी तातडीने दिल्ली गाठली आणि केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांची भेट घेतली. त्यापाठोपाठ सध्या जपान दौऱ्यावर असलेल्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक ट्वीट करून राज्यातील जनतेला महत्त्वाची माहिती दिली. केंद्र सरकार २ लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करणार असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. कांदा उत्पादकांचे हित जपण्यासाठी नाशिक आणि अहमदनगर येथे विशेष खरेदी केंद्र सुरू करण्यात येतील. २,४१० रुपये प्रतिक्विंटल या दराने कांद्याची खरेदी केली जाईल.भाजपकडून हा निर्णय घेतल्यानंतर राष्ट्रवादीची पुंगी टाईट झाली.

मुंडे हे पियुष गोयल यांना भेटण्यापूर्वीच जपानमध्ये असलेल्या फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी फोनवरून बातचीत केली. तसेच पियुष गोयल यांनाही फोन करून याप्रकरणी काय तोडगा काढता येईल याबाबत चर्चा केली. त्यापाठोपाठ फडणवीस यांनी ट्वीट करून कांदा प्रश्नावर केंद्र सरकार काय काय करतेय याबाबत माहिती दिली. त्यामुळे कांदा प्रश्नावर भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये श्रेयवादाची लढाई सुरू असल्याचे बोलले जात आहे.



### जखम डोक्याला, मलम पायाला...

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी केंद्र सरकार आणि देवेंद्र फडणवीस यांना कांदा प्रश्नावरून टोला लगावला आहे. पवार यांनी यासंबंधी एक ट्वीट केले आहे. या ट्वीटमध्ये त्यांनी देवेंद्र फडणविसांना उद्देशून म्हटले आहे की, मुळात कांदा उत्पादक शेतकऱ्यांची समस्या अद्याप तुम्हाला समजलेली दिसत नाही. जखम डोक्याला आणि तुम्ही मलम लावताय पायाला. त्यामुळे थोडा गांभीर्याने विचार करून निर्णय घ्या. तुमच्या राजकीय खेळात सर्वसामान्य शेतकऱ्यांचा बळी देऊ नका.

**निर्यात ठप्प... :** जवाहरलाल नेहरू पोर्ट (जेएनपीटी) बंदरात निर्यातीसाठी आलेला कांदा जादा शुल्क लावल्याने गेली चार दिवसापासून कांदा बंदरात पडून आहे. जवळपास १०० हून अधिक कंटेनरमध्ये कांदा आहे. तो खराब होण्यास सुरुवात झाली असल्याचे म्हटले जात आहे. मलेशिया, संयुक्त अरब अमिरातीसह आखाती देश, श्रीलंका आदी देशांमध्ये भारतातून कांद्याची निर्यात होत असते. मात्र निर्यात शुल्कात अचानकपणे वाढ केल्याने कांद्याच्या किंमतीत वाढ झाली आहे. त्यामुळे अचानक वाढलेल्या दरावर परदेशातील व्यापारी वर्गाने कांदा घेण्यास नकार दिल्याने निर्यात ठप्प झाली आहे.

यावेळी अजित पवारांच्या शेजारी बसलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, ते श्रेयवादवाले घरी बसले आहेत. मुख्यमंत्री शिंदे यांनी नाव न घेता महाविकास आघाडी आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना टोला लगावला.

### पटोलेही भडकले...

कांद्याच्या प्रश्नावर भाजप सरकारवर तोफ डागत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, मागील वेळीही कांद्याचे दर पडल्यानंतर नाफेडमार्फत कांदा खरेदी करण्याचे राज्य सरकारने जाहीर केले होते पण प्रत्यक्षात नाफेडने कांदा खरेदी केला नाही. शेतकऱ्यांचा संताप पाहून घाबरलेल्या राज्य सरकारने केंद्र सरकारकडे धाव घेऊन नाफेडच्या माध्यमातून कांदा खरेदी करणार असल्याचे सांगत आहे. नाफेडमार्फत कांदा खरेदी ही शेतकऱ्यांची दिशाभूल आहे. केंद्र सरकारने वाढवलेले ४० टक्के निर्यात शुल्क कमी का करत नाहीत? याचे उत्तर जनतेला द्या,कांदा नाशवंत आहे, तो खराब झाला तर त्याची भरपाई सरकार देणार आहे का? शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती कमजोर करण्याचे काम भाजप सरकार करत आहे. भाजप सरकारने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केलेले आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

## तिल्हेहाळ येथे सर्पदंश झाल्याने अल्पवयीन तरुणीचा मृत्यू

**सोलापूर :** शेतात जनावरे बांधण्यास गेली असता पायास सर्पदंश झाल्याने १७ वर्षीय अल्पवयीन तरुणी उपचारादरम्यान मयत झाली. ही घटना तिल्लेहाळ (ता.दक्षिण सोलापूर) येथे शुक्रवारी घडली होती . आरती शिवाजी पांढरे (वय १७ रा. तिल्लेहाळ असे मयत झालेल्या तरुणीचे नाव आहे. ती १८ ऑगस्ट रोजी सकाळच्या सुमारास स्वतःच्या शेतात जनावरे बांधण्यात गेली होती. त्यावेळी तिच्या उजव्या पायास सर्पदंश झाला होता. तिला उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता ती सोमवारी सायंकाळी मयत झाली.

मयत आरती पांढरे हिच्या पश्चात आई, एक बहीण, आणि एक भाऊ असा परिवार आहे.गेल्या वर्षी तिच्या वडिलांचे निधन झाले होते. ती बारावी परीक्षेत उत्तीर्ण झाली होती. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## विनायक नगरात आत्महत्या

**सोलापूर :** कुंभारी रोड येथील विनायक नगरात एका ४१ वर्षीय इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. सादिक मौलाली शेख (वय ४१ रा. भारतरत्न इंदिरानगर) असे मयताचे नाव आहे. तो विनायक नगर येथील रेणुका बंडगर यांच्या घरात राहण्यात होता. आज दुपारी त्याचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले. नाही हवालदार पोळ पुढील तपास करीत आहेत.

## विषारी दारु पिल्याने एकाचा मृत्यू

### अवैद्य विषारी दारूबंदी करण्याची ग्रामस्थांची मागणी

**सुराज्य/पंढरपूर**

पळशी तालुका पंढरपूर येथे दारू पिऊन एकाचा मृत्यू झाला आहे. याबाबत संबंधित व्यक्तींच्या नातेवाईकांनी आणि ग्रामस्थांनी अवैध विषारी दारूच्या विरोधात ग्रामपंचायत कार्यासमोर आंदोलन केले आहे. पंढरपूर तालुक्यातील पळशी गावातील सोमनाथ माने या तरुणाचा तीन दिवसापूर्वी मृत्यू झाला होता. त्यानंतर माने यांच्या नातेवाईकांनी विषारी दारू पिऊन मृत्यू झाल्याचा आरोप केला आहे.

तसेच अवैध दारू विक्री बंद झाल्याशिवाय तिसऱ्या दिवसाचा विधी न करण्याचा निर्णय नातेवाईकांनी घेतला होता. त्याचबरोबर अवैध्य विषारी दारूच्या विरोधात नातेवाईकासह ग्रामस्थ आक्रमक झाले असून त्यांनी ग्रामपंचायत कार्यासमोर आंदोलन केले आहे.


## अवकाशात आज घडणार अद्भूत चमत्काराचे दर्शन

**सुराज्य/श्रीहरीकोटा**

अवघ्या जगाच्या नजरा भारताच्या चंद्र मोहिमेकडे आहेत. इस्रोचं चांद्रयान-३ चंद्रावर उतरण्यासाठी सज्ज झालं आहे. चांद्रयान-३ बुधवारी २३ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ६ वाजून ०४ मिनिटांनी चंद्राच्या पृष्ठभागावर उतरणार आहे. चांद्रयान-३ चंद्राच्या आणखी जवळ जात आहे. चंद्राच्या पृष्ठभागावर उतरण्याआधी चांद्रयान-३ च्या विक्रम लँडरने चंद्राचे फोटो आणि व्हिडीओ काढले आहेत.इस्त्रोही मोहीम यशस्वी व्हावी म्हणून देशभर प्रार्थना केली जात आहे. अवकाशातील अद्भूत चमत्काराचे दर्शन आज उभ्या देशाला घडणार आहे.

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोने ट्वीट करत विक्रम लँडरने चंद्राचे जवळून काढलेले फोटो आणि व्हिडीओ शेअर केला आहे. विक्रम लँडरच्या कॅमेऱ्यात चंद्र कसा दिसतो, हे या व्हिडीओमधून तुम्हाला स्पष्ट दिसून येईल. व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की, चंद्राच्या पृष्ठभागावर प्रकाश आहे. तसेच चंद्राच्या पृष्ठभागावर ठिकठिकाणी खड्डे दिसत आहेत. चांद्रयान-३ च्या 'लँडर इमेजर कॅमरा ४' ने हे चंद्राचे फोटो काढले आहेत. २० ऑगस्ट रोजी हे फोटो काढण्यात आले आहेत.

भारत चांद्रयान-३ या महत्त्वाकांक्षी चंद्रमोहिमेद्वारे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरण्याचा प्रयत्न करणार आहे. यामध्ये यश मिळाल्यास भारत चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश ठरणार आहे. चांद्रयान-३ २३ ऑगस्ट रोजी चंद्रावर सॉफ्ट लँडिंग करण्याचा प्रयत्न करणार आहे. याकडे संपूर्ण जगाच्या नजरा लागल्या आहेत. भारत चंद्रमोहिमेत यशस्वी झाल्यास चंद्रावर पोहोचणारा चौथा देश ठरणार आहे.




दरम्यान, रशियाचे लुना-२५ अंतराळ यान लँडिंगच्या एक दिवस आधीच अपघातग्रस्त झाले आणि तब्बल ५० वर्षांनंतर रशियाची चंद्रमोहिम अयशस्वी ठरली. लँडिंगवेळी चंद्राच्या पृष्ठभागावर आदळल्याने लुना-२५ कोसळले. लुना-२५ ही चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरण्याचा प्रयत्न करणार होते. चंद्राचा दक्षिण ध्रुव कायम अंधारात असतो. तेथे पाण्याचे साठे असण्याची शक्यता आहे. त्यामुळे चांद्रयान-३ चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणार आहे. इस्रो प्रमुखांनी दिलेल्या माहितीनुसार, चांद्रयान-३ ने आतापर्यंतचे सर्व टप्पे ठरलेल्या वेळेत पूर्ण केले आहेत. त्यामुळे चिंता करण्याचं काही कारण नाही. चांद्रयान-३ चं चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वी लँडिंग होईल, अशी खात्री त्यांनी व्यक्त केली आहे. इस्रोककडून लँडिंगसाठीची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. चांद्रयान-३ कॅमेऱ्यांद्वारे लँडिंगसाठी सुरक्षित जागा शोधतं आहे.

## मारहाण आणि कुत्रा चावल्याने जखमी महिलेसह तिघाविरुद्ध गुन्हा

**सुराज्य/माळशिरस**

भावकीत असलेल्या विहिरीतील पाणी घेण्याच्या कारणावरून काठी आणि लाथाबुक्याने मारहाण करून कुत्रा चावल्याने एक जण जखमी झाला. ही घटना गोरडवाडी (ता.माळशिरस) येथे सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात माळशिरसच्या पोलिसांनी एका महिलेसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

नाना रामचंद्र शिंगाडे (वय ४० राहणार गोरडवाडी) असे जखमींचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अमोल तुकाराम शिंगाडे, त्याची पत्नी सुनीता आणि तुकाराम ज्ञानू शिंगाळे (सर्व रा. गोरडवाडी) या तिघांविरुद्ध पोलीसांनी गुन्हा दाखल केला.

नाना शिंगाडे यांनी विहिरीतील मोटर चालू केली होती.

त्यावेळी तिघांनी मोटर चालू का केली ? शेतात यायचे नाही. असे म्हणत अमोल याने काठीने मारहाण केली. तर इतर दोघांनी हाताने मारहाण केली. त्यावेळी अमोल याचा पाळीव कुत्रा चावल्याने नाना शिंगाडे जखमी झाले.अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## जी २० परिषदेची महत्त्वपूर्ण बैठक तीन दिवस दिल्ली बंद राहणार

**नवी दिल्ली :** दिल्लीत सप्टेंबर महिन्यात जी २० परिषदेची महत्त्वपूर्ण बैठक पार पडणार आहे. याच पार्श्वभूमीवर दिल्ली सरकारने तीन दिवसांची सुट्टी जाहीर केली आहे. पुढील महिन्यात ८, ९ आणि १० सप्टेंबरला ही महत्त्वपूर्ण बैठक असल्याने या परिषदेसाठी जवळपास २५ पेक्षा जास्त देशांचे पंतप्रधान आणि राष्ट्राध्यक्ष येणार आहेत. या पार्श्वभूमीवरच दिल्ली सरकारने मोठा निर्णय घेत ८, ९ आणि १० सप्टेंबरला दिल्ली बंद ठेवण्यात येणार आहे. या तीन दिवसांत दिल्ली सरकारची प्रशासकिय कार्यालये, दिल्ली महापालिकेची सर्व कार्यालय तसेच सर्व शाळा आणि महाविद्यालयांना देखील तीन दिवसांची सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. २५ पेक्षा जास्त देशांचे पंतप्रधान आणि राष्ट्राध्यक्ष दिल्लीत येणार असल्याने त्यांच्या सुरक्षेच्या कारणास्तव या तीन दिवसांच्या सुट्टीचा निर्णय घेण्यात आला आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



भविष्य न ऐकताच ते घाईत गेले होते!!!


कल्याण
136-00-578

मुंबई
467-75-889


## लम्पी आजार पुन्हा डोके वर काढतोय; जनावरे बाजार बंद

### जि.प. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा निर्णय

**सुराज्य/सोलापूर**



जिल्ह्यामध्ये लम्पी आजाराने बाधित असणाऱ्या जनावरांची संख्या वाढत आहे. याचा विचार करून सोलापूर जिल्ह्यातील जनावरांचे बाजार बंद करण्यात आले आहेत. तसेच आंतरराज्य व अंतर जिल्हा होणारी जनावरांची वाहतूक वर बंदी घालण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ही माहिती दिली.

सोलापूर जिल्ह्यामध्ये लम्पी या आजाराचा प्रादुर्भाव वाढत आहे. मृत जनावरांमध्ये ६० टक्के ही वासरे आहेत. जिल्ह्यात माळशिरस, मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर येथे या आजाराचा प्रादुर्भाव जास्त दिसत आहे. त्यामुळे गोठा साफ ठेवणे, निर्जंतुकिकरण करणे, जनावरांचे लसीकरण करणे या पशुवैद्यकीय विभागाच्या कार्यपद्धतीनुसार व त्यांच्या मार्गदर्शनानुसार काळजी घेण्याची आवाहन करण्यात आले आहे. लम्पीचा प्रादुर्भाव आणखी वाढू नये यासाठी जिल्ह्यामध्ये होणारे जनावरांच्या बाजार बंद करण्यात आले आहेत. आंतरराज्य व अंतर जिल्हा होणारी जनावरांची वाहतुकीवर ही बंदी घालण्यात आली आहे. सध्याची परिस्थिती पाहता जिल्हा परिषद आपल्या परीने सर्व काळजी घेत आहेत.

शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी आपल्या जनावरांची काळजी घ्यावी व पशुवैद्यकीय विभागाने सांगितलेल्या सूचनांचे पालन वेळोवेळी करावे असे आवाहन सीईओ मनीषा आव्हाळे यांनी केले आहे.



### या जनावरांचा बाजार राहणार सुरू

लम्पीचा प्रादुर्भाव हा गाय बैल व त्यांची वासरे यांना अधिक होत आहे. म्हैस, शेळी, मेंढी यांना या आजाराचा त्रास होत नाही. त्यामुळे फक्त गाय वर्गीय जनावरांचे बाजार बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शेळी, मेंढी, म्हैस यांचे बाजार सुरूच राहतील असे निर्देश प्रशासनातर्फे देण्यात आले आहेत.

## महिलांच्या सौंदर्यावर वादग्रस्त विधान करणाऱ्यांना बसणार चाप

### कायद्यात दुरुस्ती करण्यासाठी समिती नेमणार : चाकणकर

**सुराज्य/मुंबई**



भाजपचे मंत्री विजयकुमार गावित यांनी अमिताभ बच्चन यांची सून, अभिनेत्री ऐश्वर्या राय हिच्या सौंदर्याबद्दल बोलताना वादग्रस्त वक्तव्य केले आहेत. ते चांगलेच भोवले आहेत. महिला आयोगाने गावितांनी केलेल्या आक्षेपार्ह विधानाची तत्काळ दखल घेत आक्रमक पावले उचलली आहेत. त्यांना नोटीस धाडत तीन दिवसांत खुलासा करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, याचवेळी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकरांनी देखील मोठे विधान केले आहे. महिलांबाबत आक्षेपार्ह विधान करताना कायद्यात दुरुस्ती करण्यासाठी समिती नेमणार असल्याची माहिती दिली आहे.

रुपाली चाकणकर म्हणाल्या, सभागृह, कुठल्याही जाहीर सभेत महिलांबाबत विविध वक्तव्य केली जातात. कधी रस्त्यांची उदाहरणे देताना, आणखी कुठली उदाहरणे देताना प्रत्येकवेळी तुम्हाला महिला कशाला हव्यात, बरोबरी करण्यासाठी महिलाच कशाला लागतात ? मी कुठल्या एका पक्षाला दोष देत नाही. पण महिलांना सन्मानच दिला पाहिजे. पण आता गावितांच्या वक्तव्यावर कडक कारवाई करण्याची शिफारस करणार आहोतच मात्र याबाबत कायद्यात काही दुरुस्ती करता येतील याविषयी देखील समिती नेमण्यात येणार आहे.